# <u>प्रेस नोट</u>

दि.१५/०७/२०२२

## मुंबई शहरामधील शाळा/कॉलेजमधील विदयार्थी व तरूणांना इलेक्ट्रॉनिक सिगारेट विक्री करणाऱ्या १२ ठिकाणांवर सी.बी.कंट्रोल, आर्थिक गुन्हे विभागाचे छापे. सदर कारवाईत एकूण १४,६०,४२०/- रूपयांची इलेक्ट्रॉनिक सिगारेट जप्त.

केंद्र शासनाकडून इलेक्ट्रॉनिक सिगारेटस्‌चा बंदी (उत्पादन, आयत, निर्यात, जाहिरात) अध्यादेश, २०१९ अन्वये देशात ई-सिगारेटवर बंदी घालण्यात आली आहे. तसेच ई-सिगारेटच्या वापरामुळे आरोग्यावर होणारे घातक परिणाम लक्षात घेऊन केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने ई-सिगारेटवर विक्री, आयात आणि उत्पादन या दोन्हींवर बंदी घातली आहे.

इलेक्ट्रॉनिक निकोटीन डिलिव्हरी सिस्टीम (**ENDS**) नावाच्या **ई-सिगारेट/वेप सिगारेट** धुम्रपान करणाऱ्यांमध्ये वाढ होत आहे. ई-सिगारेट सेवन केल्याने नैराश्य येण्याची शक्यता दुप्पट होते. जे ई-सिगारेट ओढतात त्यांना हृदयविकाराचा झटका येण्याचा धोका वाढतो. जर ते जास्त काळ सेवन केले तर रक्ताच्या गुठळयाची समस्या देखील उद्भवू शकते.

सध्या विदेशी कंपन्यांकडून उत्पादीत करण्यात येणारी ई-सिगारेट ही परवाना नसलेली उत्पादने भारतात बेकायदेशीरपणे आयात करून त्यांची मोठया प्रमाणात विक्री केली जात आहे. सदरची उत्पादने ही लोकांना धुम्रपान सोडण्यास मदत करतील या नावाखाली विकली जात असल्याने तरूणांमध्ये ई-सिगारेट वापरण्याचा कल झपाटयाने वाढत आहे. परंतु त्याच्या वापरामुळे प्रत्यक्षात फायद्या पेक्षा तोटाच जास्त आहे. त्यामुळे पालकांनी देखील आपली मुले ई-सिगारेट वापरत असल्यास त्याकडे वेळीच लक्ष दिले पाहीजे

तरूणवर्ग ई-सिगारेटच्या आहारी जात आहेत, ज्याचा त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. हे लक्षात घेऊन आर्थिक गुन्हे विभागाच्या सी.बी. कंट्रोल कक्षाकडून मुंबई मधील ई-सिगारेट उत्पादनांची विक्री करणाऱ्या दुकांनदार व इसमांची माहिती मिळविण्यास सुरूवात केली. त्यानुसार मुंबईमधील विविध ठिकाणी ई-सिगारेट/वेप सिगारेटचा साठा व विक्री केली जात असल्याची खात्री लायक माहिती गोपनीय बातमीदारांकडून प्राप्त झाली होती.

प्राप्त माहितीची शहानिशा करून त्या अनुषंगाने पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, पोलीस सह आयुक्त, आर्थिक गुन्हे व पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे-२ यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. नितीन पाटील, प्रभारी पोलीस निरीक्षक, सी.बी.कंट्रोल यांनी पोलीस अधिकारी व अंमलदारांची १२ वेगवेगळी पथके तयार करून दि. १४/०७/२०२२ रोजी क्रॉफर्ड मार्केट, नागपाडा, हिरा पन्ना मार्केट ताडदेव, कार्टर रोड/लिंकस्क्वेअर

मॉल/पाली नाका/१४ वा रस्ता खार, लोखंडवाला अंधेरी, मालाड येथे, ११ दुकाने व ऑनलाईन पध्दतीने विक्री करणारा १ इसम अशा एकुण १२ ठिकाणांवर छापा कारवाई करण्यात आली. सदर कारवाई दरम्यान दुकानांमध्ये इलेक्ट्रॉनिक सिगारेट, रिफीलिंग विविध मॉडेल्स व हुक्क्या करीता वापरण्यात येणारी सुगंधीत तंबाखू असे रू. १४,६०,४२०/- किंमतीचे एकूण २०३० इलेक्ट्रॉनिक सिगारेट, हुक्का फ्लेव्हर चे ९६३ बॉक्स मधील एकुण १२० किलो सुगंधीत तंबाखू व ई-सिगारेट करीता वापरण्यात येणारे रिफीलींग द्रावणाचे ५३ बॉटल्स (एकूण २२०० मिली Liquid) असा मुद्देमाल जप्त केला व ११ इसमांना अटक करून ई-सिगारेटसचा बंदी (उत्पादन, आयत, निर्यात, जाहिरात) अध्यादेश, २०१९ चे कलम ४, ५, ७ सह सिगारेट व अन्य तंबाखुजन्य उत्पादने (जाहिरात, प्रतिबंध, व्यापार, वाणिज्य, उत्पादन, साठा, वितरण व विक्री याचे नियमन) कायदा, २००३ कलम ७(१)(३), २० अन्वये गुन्हे नोंद केले. त्यातील एम.आर.ए. मार्ग पोलीस ठाणे, ताडदेव पोलीस ठाणे व खार पोलीस ठाणे येथील दुकानदारांना सदरच्या ई-सिगारेट १८ वर्षा खालील मुलांना विकतांना रंगेहाथ पकडण्यात आले असल्याने बाल न्याय (मुलांचे काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ चे कलम ७७ चा समावेश नोंद गुन्हयामध्ये करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. विवेक फणसळकर, पोलीस सह आयुक्त, आर्थिक गुन्हे श्री. प्रविण पडवळ, पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे-२ श्री. महेंद्र पंडीत,यांच्या मार्गदर्शनाखाली सी.बी. कंट्रोलचे प्रभारी पोलीस निरीक्षक नितीन पाटील, स.पो.नि.रोहित सावंत,रूपेश दरेकर, राजेंद्र शिवदे, वाणी, पो.उ. नि. सावर्डे, दयानंद भारती, पो.ह. महेश नाईक, गणेश डोईफोडे, महेंद्र जाधव, चंद्रकांत वलेकर, महेंद्र दरेकर, संतोष पवार, सुर्यवंशी, नेमिचंद जाधव, पोलीस नाईक शेखर भंडारी, संतोष पाटील, विशाल यादव, पोलीस शिपाई नितीन मगर, भरत खारवी, रोहन शेंडगे, पाटील, गायकवाड, अमोल काटे, गांगड सी.बी.कंट्रोल, आ.गु. वि., मुंबई या कक्षाकडून करण्यात आली.